


मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# यंदा महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार!

## आमदार जगताप यांचा पाठपुरावा: ८.३३ टक्के प्रथा बोनसासह ३० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना यंदा वाढीव सानुग्रह अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना दरवर्षी देण्यात येणारा ८.३३ टक्के प्रथा बोनस आणि २५ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान यामध्ये वाढ करून आता ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने उपसूचनेसह मंजुरी दिली आहे.**





सन २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांसाठी बोनस व सानुग्रह अनुदान देण्याचा करारनामा करण्यास तसेच त्यासाठी होणाऱ्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. उपसूचनेसह हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने दिवाळीचा प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान देण्यासाठी पाच वर्षांचा करारनामा करण्याची मागणी केली होती. त्यानुसार कामगार कल्याण मंडळाने स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर केला. या मागणीसाठी आमदार शंकर जगताप यांनीही पुढाकार घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

महापालिका आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही नियमानुसार प्रथा बोनस व सानुग्रह अनुदानाचा लाभ दिला जातो. त्यानुसार ८.३३ टक्के प्रथा बोनसासोबत पूर्वी २५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद होती. मात्र, स्थायी समितीने उपसूचना मंजूर करून ही रक्कम २५ हजारांवरून ३० हजार रुपये करण्यास मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, त्यांच्या कुटुंबीयांचीही यंदाची दिवाळी अधिक आनंदात साजरी होणार आहे. अंतिम मंजुरीनंतर वाढीव सानुग्रह अनुदानाचा लाभ कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.




# पुणे-पिंपरीत एफडीएची धडक कारवाई

» पिंपरी | प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासनाची स्वच्छता व अन्नसुरक्षेवर लक्ष केंद्रित; नियमभंग, अस्वच्छता आणि मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांमुळे सहा हॉटेल-बेकरींचे परवाने निलंबित.

अन्न व औषध प्रशासनाने पुणे, पिंपरी-चिंचवडमधील हॉटेल, बेकरी, रेस्टॉरंट यांची तपासणी केली असता, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सहा आस्थापनांचे परवाने निलंबित केले. याशिवाय कोंढवा बुद्रुक परिसरात विनापरवाना वाहतूक केला जाणारा ५९८ किलो मीठा मावा जप्त केला असून, त्याची किंमत सुमारे दीड लाख रुपये आहे.

या विशेष मोहिमेत हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी तसेच विविध खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. यादरम्यान काही आस्थापनांमध्ये अस्वच्छता, मुदत संपलेले खाद्यपदार्थ साठवून ठेवणे, तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील नियमांचे उल्लंघन आढळून आले.

ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असलेल्या या प्रकारांची गंभीर दखल घेत आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातही कारवाई केली असून, तेथील हॉटेलांवर कारवाई केली आहे.

# भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महापालिका भवन विद्युत रोषणाईने उजळले

» पिंपरी | प्रतिनिधी

**भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत करण्यात आलेल्या या रोषणाईमुळे संपूर्ण महापालिका भवन तिरंग्याच्या रंगांनी सजले असून नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.**



स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाचे प्रतीक म्हणून इमारतीवर विविध रंगांची प्रकाशयोजना करण्यात आली आहे. संध्याकाळच्या वेळेस ही रोषणाई अधिक उठावदार दिसत असून परिसरात देशभक्तीचे आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाने विशेष नियोजन करून ही आकर्षक प्रकाश सजावट साकारली आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त शहरातील नागरिकांना राष्ट्रीय अभिमानाची अनुभूती देण्याच्या उद्देशाने ही रोषणाई करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.महापालिका भवनावरील या विद्युत रोषणाईचे नागरिकांकडून कौतुक होत असून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला इमारतीचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे.

# यशवंतनगरातील सर्व्हिस रोडची दुरुस्ती; नागरिकांना दिलासा

## चेंबरलगत दबलेला रस्ता आणि खड्ड्यांची केली डागडुजी; नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**प्रभाग क्रमांक ९ मधील यशवंतनगर परिसरातील सर्व्हिस रोडवरील खराब झालेल्या रस्त्याची अखेर दुरुस्ती करण्यात आली आहे. चेंबरच्या बाजूचा रस्ता काही ठिकाणी दबला होता, तर काही ठिकाणी मोठे खड्डे पडल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता.**



> “नागरिकांची सुरक्षित आणि सुलभ ये-जा ही आमची प्राथमिकता आहे. यशवंतनगरातील सर्व्हिस रोडवरील खड्डे आणि चेंबरलगत दबलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन तातडीने दुरुस्तीचे काम करून घेतले आहे. प्रभागातील मूलभूत सुविधांबाबत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. नागरिकांना चांगल्या सुविधा मिळेपर्यंत हा पाठपुरावा असाच सुरू राहील.”
> डॉ. वैशाली घोडेकर, मा. महापौर, नगरसेवक.

यशवंतनगर परिसरातील नागरिकांना होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन मा. महापौर व नगरसेविका डॉ. वैशाली घोडेकर लोंढे यांनी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला.

त्यानंतर सर्व्हिस रोडवरील खड्डे बुजवून तसेच दबलेल्या भागाची दुरुस्ती करून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत करण्यात आला. या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, वाहनचालकांचीही गैरसोय दूर झाली आहे.

पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था आणखी खराब होऊ नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी वेळेत दुरुस्तीची कामे करण्यात यावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. “नागरिकांना दैनंदिन ये-जा करताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रभागातील मूलभूत सुविधांकडे सातत्याने लक्ष दिले जात आहे. यशवंतनगरातील सर्व्हिस रोडवरील खड्डे आणि दबलेला रस्ता दुरुस्त करून नागरिकांची गैरसोय दूर करण्यात आली आहे. प्रभागातील अन्य समस्या देखील प्राधान्याने सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरू राहील,” असे डॉ. वैशाली घोडेकर लोंढे यांनी सांगितले.



# मोशी कचरा डेपो दुर्घटनेत पतीच्या मृत्यूनंतर पत्नीचाही दुर्दैवी अंत..

**पिंपरी | प्रतिनिधी**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेने एका कुटुंबाचा आधार हिरावून घेतला... पतीच्या मृत्यूनंतर शासनाकडून मिळणाऱ्या मदतीच्या पैशांच्या वाटपावरून सुरू झालेल्या वादाने मात्र या कुटुंबातील दुःख आणखी गहिरे केले. पतीच्या मृत्यूचे दुःख मनात असतानाच मानसिक छळ आणि टोमण्यांना सामोरे जावे लागल्याने एका महिलेने आत्महत्या केल्याचा धक्कादायक आरोप पोलिस तक्रारीत करण्यात आला आहे.**

मोशी येथील संजय गांधीनगर परिसरात २०२१ ते १२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचे पोलिस नोंदीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी १३ ऑगस्ट रोजी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस तक्रारीनुसार, संबंधित महिलेच्या पतीचा मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झाला होता. पतीच्या मृत्यूनंतर कुटुंबाला मदतनिधी मिळणार होता. मात्र, या मदतनिधीच्या पैशांच्या वाटपावरून तिच्यावर वाद घालणे, शिवीगाळ करणे आणि मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच हुंडा न दिल्याने, खर्च न केल्याने आणि मुलगीच झाल्याच्या कारणावरूनही तिला वारंवार टोमणे मारण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

ज्याच्या मृत्यूने घराचा आधारच हिरावला, त्याच मृत्यूच्या मदतीच्या पैशांवरून पुन्हा घरातच संघर्ष सुरू झाला. पती गमावलेल्या महिलेच्या दुःखावर मानसिक छळाचे घाव बसत गेले आणि सततच्या कौटुंबिक वाद व मानसिक त्रासामुळे तिने जीवन संपवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत पती गमावलेल्या या महिलेच्या कुटुंबावर आलेल्या या दुहेरी आघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा तपास एमआयडीसी भोसरी पोलिस करीत असून, तक्रारीतील आरोपांची पडताळणी करून पुढील कायदेशीर कारवाई केली जात आहे.

# व्यावसायिक आस्थापनांना 'शॉप ॲक्ट' नोंदणीसाठी सीसीटीव्ही बंधनकारक करा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शहराचा वेगाने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि महिला सुरक्षेचा विचार करता शहरातील सर्व व्यावसायिक आस्थापनांना 'शॉप ॲक्ट' नवीन नोंदणी व नूतनीकरण करताना किमान दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करावे, अशी मागणी नगरसेविका सौ. कविताताई भोंगळे-पाटील यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



महापालिकेच्या मासिक सर्वसाधारण सभेत त्यांनी हा विषय विशेष लक्षवेधी मुद्दा म्हणून मांडला होता. या प्रस्तावाला सभागृहाने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने आता त्यावर तातडीने प्रशासकीय निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

प्रमुख औद्योगिक व व्यावसायिक केंद्र असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात सध्या ३० हजारांहून अधिक व्यावसायिक आस्थापना, दुकाने आणि कार्यालये कार्यरत आहेत. शहरात विविध भागात घडणाऱ्या चोरी, वाहनांची तोडफोड, फसवणूक व महिलांशी संबंधित गुन्ह्यांची उकल करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज हा अत्यंत महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. सर्व आस्थापनांमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य केल्यास संपूर्ण शहरात हजारो कॅमेऱ्यांचे एक प्रभावी आणि मजबूत सुरक्षा जाळे तयार होईल. यामुळे गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक दबाव निर्माण होऊन गुन्ह्यांचे प्रमाण घटण्यास मदत होईल आणि पोलिसांनाही तपासकार्य अधिक वेगाने करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या सुरक्षा यंत्रणेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'शॉप ॲक्ट' नोंदणी आणि नूतनीकरणाच्या प्रक्रियेत काही महत्त्वाच्या अटी लागू करण्याची सूचना निवेदनात करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक आस्थापनेसाठी किमान दोन सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक असावेत, ज्यातील एक कॅमेरा मुख्य प्रवेशद्वार व बाह्य परिसरावर तर दुसरा कॅमेरा दुकानातील व्यवहार आणि ग्राहकांच्या हालचालींवर लक्ष ठेवणारा असावा. याशिवाय सीसीटीव्ही फुटेज किमान ३० दिवस सुरक्षित ठेवणे बंधनकारक करावे आणि नोंदणी किंवा नूतनीकरण करताना सीसीटीव्ही बसवल्याचा पुरावा म्हणून फोटो, बिल किंवा इन्स्टॉलेशन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक करावे, असे भोंगळे-पाटील यांनी सुचवले आहे.

सदर उपाययोजनेमुळे शहरातील व्यापारी, ग्राहक, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेला मोठे बळ मिळणार असून "सुरक्षित, सजग व स्मार्ट पिंपरी-चिंचवड" घडविण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. यासाठी महानगरपालिका आणि पोलिस प्रशासनाने परस्पर समन्वयाने ही यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी, अशी आग्रही मागणी नगरसेविका कविताताई भोंगळे-पाटील यांनी केली आहे.

# महापालिका घेणार 1,167 कोटींचे कर्ज!

## शहर विस्तारासह समाविष्ट गावांच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे शहराचा चारही दिशांना झालेला विस्तार आणि वाढत असलेली लोकसंख्या यामुळे महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या सुविधांवर ताण येत आहे. महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमुळे शहराचे क्षेत्रफळ वाढले आहे.**




या भागातील नागरिकांनाही आवश्यक त्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी महापालिकेवर आली आहे. त्यासाठी महत्त्वाचे प्रकल्प उभारणे आवश्यक असल्याने त्यासाठी १ हजार १६७ कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा, पूरनियंत्रण आणि मलनि:सारण प्रकल्पांसाठी या कर्जाचा वापर केला जाणार आहे.

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना सोयीसुविधा देण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. महापालिकेत समाविष्ट झालेल्या १२ गावांसाठी पाणीपुरवठा योजना, शहरातील पूरग्रस्त ठिकाणांसाठी पूरनियंत्रण प्रकल्प, तसेच समाविष्ट ७ गावांसाठी मलनि:सारण व्यवस्था उभारण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

या तिन्ही प्रकल्पांची एकूण किंमत २ हजार ३३४ कोटी रुपये आहे. यापैकी ५६७.१५ कोटी रुपये केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. तर महापालिका, राज्य सरकारकडून प्रत्येकी ५९९.९८ कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. प्रकल्पासाठी उर्वरित १ हजार १६७ कोटी रुपये कर्ज, कर्जरोखे, किंवा अन्य वित्तीय संस्थांच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहेत.

या कर्जासाठी राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँका, तसेच वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक कर्ज प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत. या बाबतचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार करुन स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवला आहे. आज शुक्रवारी (१४ ऑगस्टला) होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. यापूर्वी महापालिकेने २०१७ मध्ये २०० कोटी रुपयांचे कर्जरोखे उभारले होते. त्यानंतर प्रथमच एवढ्या मोठ्या रकमेचे कर्ज उभारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

### या प्रकल्पांसाठी महापालिका घेणार कर्ज

- समाविष्ट १२ गावांसाठी पाणीपुरवठा योजना – ८९० कोटी रुपये, कर्जातून ४४५ कोटी रुपये उभारणी
- पूरनियंत्रण प्रकल्प – ४०० कोटी रुपये, कर्जातून २०० कोटी रुपये उभारणी
- समाविष्ट ७ गावांसाठी मलनि:सारण व्यवस्था – १,०४४.१३ कोटी रुपये, कर्जातून ५२२ कोटी रुपये उभारणी

### महापालिकेच्या साडेचार हजार कोटींच्या ठेवी

पुणे महापालिकेच्या विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये तब्बल साडेचार हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये महापालिका प्रशासनाने बचत करून या ठेवी ठेवल्या आहेत. मात्र तरीही महापालिका १३६७ कोटी रुपयांचे कर्ज का घेत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# पुण्यातील रस्त्यांची दुरावस्था, महापौरांनी दिले महत्त्वाचे आदेश!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**'गेल्या दोन वर्षांत महापालिकेने शहरातील विविध भागांत केलेल्या रस्त्यांच्या कामांची सविस्तर यादी, दोषदायित्व कालावधी (डीएलपी), त्यावर झालेले पुनर्डांबरीकरण तसेच त्याच्या दुरुस्तीसाठी महापालिका प्रशासनाने खर्च केलेला निधी, याचा सविस्तर अहवाल आठ दिवसांत सादर करावा,' असे आदेश महापौर नागपुरे यांनी दिले.**





शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून, खड्डे दुरुस्ती तसेच खोदलेल्या रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणावर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुनही रस्ते दुरुस्तीचा दर्जा समाधानकारक नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महापौर नागपुरे यांनी पथ विभागाची बैठक घेतली. या वेळी आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीनंतर महापौरांनी पत्रकार परिषद घेतली. त्यामध्ये त्यांनी आठ दिवसांत प्रशासनाला अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. महापौर नागपुरे म्हणाल्या, 'रस्ते दुरुस्तीची कामे करताना एकच काम दोन वेळा केल्याचे आढळल्यास त्याची चौकशी करावी. यामध्ये जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदारांवर आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत करताना योग्य पद्धतीने का केले जात नाहीत. गेल्या दोन वर्षांत शहरात झालेल्या रस्त्यांच्या कामांची माहिती गोळा करून सविस्तर अहवाल द्यावा. तसेच, रस्त्यावर पडलेले सर्व खड्डे आठ दिवसांत बुजवावेत,' असे आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

पुणे शहरात किती लांबीच्या रस्त्यांची कामे झाली, सायकल स्पर्धेसाठी किती रस्ते करण्यात आले, त्यावर किती खर्च झाला, त्यावर किती खोदकाम झाले, दोष दायित्व कालावधी कसा संपुष्टात आला, याची संपूर्ण माहिती पथ विभागाकडे एकत्रित उपलब्ध नसल्याचे महापौर नागपुरे म्हणाल्या.

गेल्या आठवड्यात यंदा कमी खड्डे असल्याचे वक्तव्य महापौर मंजुषा नागपुरे यांनी केले होते. मग पाच दिवसांतच पथ विभागाची बैठक घेऊन खड्डे दुरुस्तीचे आदेश देण्याची वेळ का आली? असा प्रश्न महापौर नागपुरे यांना विचारला असता, त्या म्हणाल्या, महापालिका प्रशासनाने खड्डे कमी असल्याची माहिती दिली होती. गेल्या वर्षी २०२५ मध्ये महापालिकेकडे खड्ड्याबाबत ५ हजार ९३१ खड्डे असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. यंदा २०२६ मध्ये या तक्रारी ३ हजार २३० इतक्या आहेत.

### 'डीएलपी'साठी नवी एसओपी

ठेकेदाराने रस्त्याचे काम पूर्ण केल्यानंतर रस्त्याच्या दोषदायित्व कालावधीमध्ये (डीएलपी) दुरुस्तीची गरज भासल्यास काही ठेकेदारांकडून दुरुस्तीचे काम नाकारले जाते. त्यामुळे 'डीएलपी'च्या निश्चित कार्यपद्धतीमध्ये (एसओपी) बदल करणे आवश्यक आहे. रस्त्याची कोणती हानी झाल्यानंतर ठेकेदाराने दुरुस्ती करणे बंधनकारक राहील, याचे स्पष्ट निकष निश्चित करणे आवश्यक असल्याचे महापौर नागपुरे यांनी सांगितले.

# तुकाराम मुंढे यांची डॅशिंग कारवाई!

## कॅम्प परिसरातील बर्गर किंग आणि झेप्टोवर टाच, थेट परवाना रद्द

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुणेकरांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बड्या कंपन्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे. डॅशिंग अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या धडक कार्यपद्धतीचा अवलंब करत अन्न व औषध प्रशासनाने पुण्यात मोठी स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. 'नाव मोठे पण लक्षण खोटे' अशी अवस्था असलेल्या काही बड्या ब्रँड्सवर एफडीएने सर्जिकल स्ट्राईक केला असून, याचा दणका आता पुण्यातील प्रसिद्ध 'बर्गर किंग' आणि 'झेप्टो' कंपनीला बसला आहे.**



पुण्यातील तरुणाई आणि खवय्यांची नेहमीच गर्दी असणाऱ्या कॅम्प भागातील 'बर्गर किंग'वर प्रशासनाने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. दररोज हजारो नागरिक चवीने जिथे बर्गर खातात, तिथेच अन्नसुरक्षेचे तीनतेरा वाजल्याचे उघडकीस आले आहे. एफडीएच्या पथकाने केलेल्या अचानक तपासणीत येथे अन्नाच्या दर्जात मोठी तडजोड होत असल्याचे समोर आले. तसेच, रेस्टॉरंटमधील अस्वच्छतेमुळे ग्राहकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला होता. या गंभीर त्रुटी पाहता, मुंढे स्टाईलने कुठलीही दयामया न दाखवता या आउटलेटचा परवाना थेट रद्द करण्यात आला आहे.

पुण्यात एफडीएने मोठी कारवाई केली आहे. पुण्याच्या कॅम्प परिसरात एफडीएने बर्गर किंगवर छापा टाकला. यावेळी खाद्य पदार्थासंदर्भात गंभीर त्रुटी आढळल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे अन्न आणि औषध प्रशासनाने या प्रसिद्ध बर्गर किंगवर मोठी कारवाई केली आहे. एफडीएने या बर्गर किंगचा थेट अन्न सुरक्षा परवाना रद्द केला आहे.

बर्गर किंगवर पुणेकरांचा मोठा विश्वास होता. इथे दररोज हजारो पुणेकर बर्गर खाण्यासाठी येतात. या बर्गर किंगवर पुणेकरांची नेहमी रेलचेल असायची. पण आता एफडीएच्या अधिकाऱ्यांनी या बर्गर किंगवर छापा टाकल्यानंतर खाद्य पदार्थांबाबत गंभीर त्रुटी आढळल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे या बर्गर किंगचा थेट परवाना रद्द करण्याचा मोठा निर्णय एफडीएने घेतला आहे.

### पुण्यात Zepto कंपनीच्या गोडाऊनवर धाड

एफडीएने केवळ बर्गर किंगवर कारवाई केली नाही तर पुण्यातील लोहगाव येथील ZEPTO कंपनीच्या गोडाऊनवर देखील धाड टाकली. यावेळी एफडीएने थेट परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला. रिफ्रेजरेटर आणि फ्रोझन केलेल्या पदार्थात अनेक त्रुटी आढळल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. 'दहा मिनिटांत डिलिव्हरी'चा दावा करत सामान पोहोचवणाऱ्या 'झेप्टो' कंपनीलाही या कारवाईचा मोठा फटका बसला आहे. लोहगाव येथील झेप्टोच्या गोदामावर अचानक टाकलेल्या छाप्यात अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आले.

### नेमकी कारवाई काय केली?

अन्न आणि औषध (एफडीए) प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात एफडीए प्रशासनाकडून राज्यात नागरिकांच्या सुरक्षेसाठी वेगवेगळ्या हॉटेल आणि आस्थापनांवर छापेमारी केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचू नये यासाठी विविध हॉटेल आणि आस्थापनांकडून अन्न सुरक्षा नियमांचे पालन केले जात आहे ना? याची तपासणी अन्न आणि औषध प्रशासनाकडून केली जात आहे. एफडीएने पुण्यात आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सर्वात मोठ्या कारवाया केल्या आहेत. लाखो पुणेकर ज्या आस्थापनांवर डोळे बंद करुन विश्वास ठेवतात त्याच आस्थापनांवर एफडीएने धाड टाकली. यावेळी नियमांचे उल्लंघन झाल्याचे लक्षात आल्यानंतर थेट परवाना रद्द करण्याची मोठी कारवाई केली आहे.

# बारामतीत ३० लाखांच्या दुचाकींसह सराईत चोरट्याला अटक

» पिंपरी | प्रतिनिधी

**बारामती शहर व तालुका परिसरात बुलेटसह दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखा आणि बारामती तालुका पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून १३ बुलेटसह १९ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. चोरीच्या वाहनांवर त्याने महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र वनसेवा आणि एसटी महामंडळाचे बोधचिन्ह लावून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निदर्शनास आले आहे.**






समाधान बाळू काळे (वय २३, रा. मानेवाडी, ता. फलटण, जि. सातारा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या दुचाकींची किंमत सुमारे ३० लाख रुपये आहे. पोलीस चौकशीत बारामती शहर आणि तालुका पोलीस ठाण्यातील १९ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बारामती परिसरात गेल्या काही दिवसांपासून बुलेट चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. त्यामुळे वाहनचोरांचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि बारामती तालुका पोलिसांची स्वतंत्र पथके तयार केली होती. संशयित व्यक्ती व वाहनांवर लक्ष ठेवण्यासह रात्रीची गस्त वाढविण्यात आली होती.

चोरीची मोटारसायकल घेऊन एक संशयित मेडिकल कॉलेज परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या त्यानुसार पोलिसांनी या परिसरात सापळा लावला. पेन्सिल चौकाकडून मेडिकल कॉलेजच्या दिशेने दुचाकीवरून येणाऱ्या सकाळे याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने रात्रीच्या वेळी बुलेटसह अन्य दुचाकी चोरल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीने चोरीच्या वाहनांवर महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र वनसेवा आणि एसटी महामंडळाचे बोधचिन्ह लावून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निदर्शनास आले आहे. त्याने आणखी किती वाहने चोरली आहेत, चोरीच्या वाहनांची विल्हेवाट कशी लावली, याचा तपास करण्यात येत आहे. बारामती तालुका पोलीस करीत आहेत.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर आणि बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.